प्रकरण २ रे

संशोधन कार्याची गरज

NEED OF STUDY

-: प्रकरण - २ रे :-

संशोधन कार्याची गरज

शिक्षण ही राष्ट्राची गरज आहे कोणत्याही राष्ट्राची प्रगती तेथील प्रचलित असलेल्या शिक्षण व्यवस्थेवर अवलंबून असते. या दृष्टीने शिक्षण हे जर राष्ट्राच्या प्रगतीचे मापदण्ड व अविभाज्य घटक असेल तर शिक्षणाच्या सर्व प्रश्नांचा सखोल अभ्यास करणे आवश्यक आहे. शिक्षण प्रक्रियेतील " विद्यार्थी"हा प्रमुख घटक असून त्यांना जीवन विकासास आवश्यक ते सर्व अनुभव देणे हे शिक्षणाचे कार्य होय. ज्या प्रमाणे शास्त्र विषय शिकवितांना प्रयोग शाळा आवश्यक असते त्याच प्रमाणे शारीरिक शिक्षणाची प्रगती ही संस्थेत उपलब्ध असलेल्या साहित्याच्या प्रमाणावर व ते राबविणा-या शैक्षणिक तंत्रावर व पध्दतीवर अवलंबून असते.

वास्तविक पाहता इतर विषयापेक्षा शारीरिक शिक्षणामुळे व्यक्तीच्या समतोल विकासात जास्त मदत होऊ शकते. सामाजिक दृष्टीकोणातून व्यक्तीच्या विकासासाठी व्यक्तीमध्ये काही बदल आवश्यक असतात. हा बदल त्याच्या प्रवृत्ती सुधारणेमुळे संभवत असतो. निश्चित उत्तेजनामुळे स्वभाविक प्रतिक्रियेलाच महत्वाच्या प्रवृत्त्या [Orginal Tendencies] म्हटले जाते. ह्या प्रवृत्त्या नाडी-संस्था तसेच शरीर-रचना याच्या आधारावर संभवतात. व्यक्ती आपल्या अनुभवाने या प्रवृत्त्यामध्ये बदल करीत असतो. प्रतिक्रियाच्या प्रेरणेला बदलल्याने प्रतिक्रिया मध्ये परिवर्तन येते. अन्य कार्यापेक्षा शारीरिक शिक्षणात नियंत्रित स्वरुपात प्रवृत्त्याना व्यक्त करण्याची संधी अधिक प्रमाणात मिळते.

विद्यार्थ्यांना सर्व मिळून धावणे, उड्या मारणे इत्यादींची संधी मिळाल्यामुळे त्यांच्या सामुहिक जीवनाची इच्छापूर्ती होते. शारीरिक शिक्षणाच्या कार्यक्रमाने विद्यार्थ्यांमध्ये सहयोग, सहनशीलता, उदारता, उत्साह, साहस, चारित्र्यिक स्थिरता इत्यादी गुणांचा विकास होतो. मौलिक प्रवृत्तीच्या बदलाबरोबर शारीरिक शिक्षण व्यक्तित्व निर्माण करण्यासाठी अन्य प्रकारे सुध्दा सहाय्य करते. शारीरिक शिक्षणाच्या कार्यक्रमाद्वारे विद्यार्थ्यात उदार भावना दुसऱ्याच्या प्रति आदर भावना, सत्यवादीता, सहिष्णुता इत्यादी गुणांची जोपासना होते. विद्यार्थी खेळातील नियमांचा आदर करतो आणि विरोध पक्षाला किंवा प्रतिस्पर्ध्याला नियमानुसार विजय प्राप्त करण्याची संधी देतो. या सर्वगुणासाठी केवळ क्रीडावृत्ती [Sportmanship] या एकाच शब्दाचा वापर शारीरिक शिक्षणात केला जातो. म्हणजेच क्रीडावृत्ती मध्ये वरील सर्व गुणांचा समावेश होतो. म्हणूनच अमेरिकेमध्ये "स्पोर्टस मॅनशिप " ह्या संस्थेने पुढील लक्ष्य ठरविले.

" Keep a sound soul, a clean mind and a healthy body. PLAY THE GAME". -- 7.

---

7) Quoted from Sharman, J.R. Introduction to Physical Education, Seventy Edition, A.S. Barnan Co. New Yourk, Page No. 80.

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

"मानवी मनाच्या शक्तीचे स्वरूप दुहेरी असते. काही शक्ती असलेले जपून ठेवण्याचे कार्य करतात, तर इतर शक्ती काहीतरी नवीन निर्माण करतात. या दृष्टीने स्वयं ही पहिल्या प्रकारची शक्ती असून क्रीडा ही दुसऱ्या प्रकारची शक्ती आहे." -- ८.

खेळात आणणात मानवी जीवनातील रचनात्मक क्रियाशक्तीचे आविष्करण दिसून येते. या आविष्कारात स्वाभाविकता, स्वातंत्र्य आणि आनंद प्रकट होत असल्याने क्रीडा व खेळ हे मानवी जीवनात एक महत्वाचे अंग समजले जाते. म्हणूनच मॅग्डूल "क्रीडेस सूचन व अनुकरण या स्वाभाविक प्रवृत्तीप्रमाणेच शरीर-मानसिक शक्तीचे विकसन व संवर्धन करणारी प्रवृत्ती"--९. असे मानतो. क्रीडेद्वारे आत्मप्रकाशन या आत्मप्रदर्शनादी अनेक सहजप्रवृत्तीचे आविष्करण होते. क्रीडाप्रवृत्ती ही बालकाच्या हाडी-मासी इतकी खिळलेली असते की बालक व खेळ ही एक अभेद्य जोडगोळी होऊन बसलेली आहे. क्रीडा करीत असताना अवधान केंद्रित केले जाते. त्यामुळे एक प्रकारचे तादात्म्य उत्पन्न होते. या अवधानाच्या मुळाशी अर्थातच अभिरुची तितकीच स्वरूपात कार्यप्रवणशील झालेली असते. मुले खेळण्यात दंग असताना त्यांना इतर जगाचे बिल्कुल भान राहात नाही. हे आपल्या सर्वांच्या नित्याच्या परिचयाचे आहे. हा मुलाचा स्वभाव त्यांची क्रीडेविषयीची अतिशय आवड व त्याचा परिणाम म्हणून अवधानाचे केन्द्रीकरण याच गोष्टीची आठवण करून देते.

८] शैक्षणिक मानसशास्त्र - प्रां. ग. करंदे, व्हीनस प्रकाशन पुणे १९७३ पा. १३९.

९] शैक्षणिक मानसशास्त्र - प्रां. ग. करंदे, व्हीनस प्रकाशन पुणे १९७३.

निसर्गाने माणसाच्या शरीराची रचनाच अशी केली आहे की, शारीरिक श्रम केले तरच माणसाचे सामर्थ्य आणि आरोग्य दिर्घकाळ टिकते. नाही तर शरीर गंजून जाते. म्हणून प्राचीन काळापासून बदलत्या परिस्थितीत आरोग्य आणि शरीर सामर्थ्य कसे टिकवावे याबाबतचे विचार मंथन चालू आहे. नुसते श्रम केव्हाही कंटाळवाणेच म्हणूनच मेहनती बरोबर आनंदही मिळावा या कल्पनेतून विविध खेळ व सामने निघाले. खेळामुळे शारीरिक सामर्थ्य वाढते. मनाला अतिशय आनंद देणारा आणि संकटांना विसरायला लावणारा खेळ हा जीवनातील महत्वाचा घटक आहे.

"शरीरश्रमाला एखाद्या हेतूची जोड दिली की तो व्यायाम होतो. व्यायामाला करमणूकीची जोड दिली की तो क्रीडा होते. क्रीडेला नियमांनी बांदिस्त केले म्हणजे खेळ बनतात." – १०

शरीर व मनोव्यापाराच्या अनिर्बंध हालचाली होण्याचे महत्वाचे ठिकाण म्हणजे क्रीडांगण. क्रीडांगण म्हणजे प्रयोगशाळाच की जेथे प्रयोग व निरिक्षण करीत रहावे. आजच्या शारीरिक शिक्षणात या प्रयोगशाळाना येथील क्रीडा प्रकारांना व क्रीडा पध्दतीना विशेष महत्वाचे स्थान दिले जात नाही. वास्तविक पाहता इतर विषयापेक्षा शारीरिक शिक्षणामुळे व्यक्तीच्या समतोल विकासात जास्त मदत होऊ शकते. या संभाव्य लाभाची अजून जाणीव न झाल्याने शारीरिक शिक्षणाची अत्यंत हेळसांड होत आहे.

१०] शारीरिक शिक्षण म. ग. बटवधन, विकास प्रकाशन, मुंबई. पान नं. ३.

हल्लीची शारीरिक शिक्षणाची अवस्था पाहता शारीरिक शिक्षण अनेक अडचणीमुळे मागासलेले दिसून येत आहे. शैक्षणिक सोई-सवलतींचा अभाव, पालकांचा शिक्षणासंबंधीचा एकांगी दृष्टीकोन, त्याच प्रमाणे शारीरिक शिक्षणाचा चुकीचा लावला गेलेला अर्थ, शासनाची उदासिनता व धरसोडीचे धोरण, समाजाचा अल्पसहभाग, संशोधनाचा अभाव इत्या व अशा अनेक कारणाने मागासलेपणा असल्याचे विचारांती आपल्या लक्षात येते. त्याचा प्रत्यक्षाप्रत्यक्ष परिणाम म्हणून या क्षेत्रात म्हणजे शारीरिक शिक्षणात कुठलेही क्रांतीकारक बदल घडलेले दिसत नाहीत. क्रांतीकारी बदलाचे कुठलेही पडसाद या शिक्षण क्षेत्राच्या प्रमुख प्रवाहात मुख्यत्वेकरुन माध्यमिक स्तरावर दिसून येत नाहीत. राष्ट्रीय शिक्षणाची गुणवत्ता वाढविणे हे कोणत्याही शिक्षण पध्दतीचे कर्तव्य ठरते. म्हणून शिक्षणाचा विचार करीत असताना शिक्षण ही समग्र प्रक्रिया समजून त्यातील अनेक घटकांचा सर्वकष आणि एकात्म विचार करणे आवश्यक ठरते.

व्यक्तिमत्वाची अविभाज्यता आपण मान्य केली की, शारीरिक शिक्षणाचे स्वरुप ही आपणास पटकन उमजू लागते.

हल्ली शाळांमधून निवडक खेळाडूकडेच लक्ष दिले जाते. सर्वसाधारण विद्यार्थ्यांकडे लक्ष दिले जात नाही. वेळापत्रकात शारीरिक शिक्षणाला इतर विषयापेक्षा कमी तासीका दिल्या जातात. इतर सर्वसामान्य विषयाला आठवड्यातून सहा तासीका असतात. मात्र शारीरिक शिक्षणाला मात्र आठवड्यात जास्तीत जास्त तीन किंवा बहुदा दोनच तासीका असतात, असा संशोधकाचा अनुभव आहे.

अभ्यासक्रम व वेळापत्रक याकडे पाहिल्यास विशेषत: माध्यमिक स्तरावर पाचवी ते दहावी पर्यंत तासीका क्रमा-क्रमाने कमी कमी केल्या जातात व दहाव्या वर्गाला बहुसंख्य शाळातून आठवडी दोनच तासीका असतात. काही शाळांमधून इयत्ता दहावीला शारीरिक शिक्षणाचे तासच नसतात. आपण जर विचार केला तर जसजसा विद्यार्थी वरच्या वर्गात जातो, तसतसी त्याच्या शारीरिक शिक्षणाची गरज कमी कमी होत जाते; असेच म्हणावे लागेल. ही मोठी खेदाची व गांभिर्याची बाब आहे. पालकांचा दृष्टीकोन ही असाच दिसून येतो. ज्याप्रमाणे शाळेसाठी मुलांना वह्या-पुस्तके, पेन्सिल, पेन साहित्य खरेदीसाठी पालक खर्च करतो त्याप्रमाणे तो खेळ साहित्यासाठी मात्र खर्च करण्यासाठी उत्सुक दिसून येत नाही. एखादा विद्यार्थी अभ्यासात चमकला की, पालक त्याचे कौतुक करतात पण एखादा खेळाडू [विद्यार्थी] जिल्हा किंवा राज्य पातळीवर गेला तर त्याचे कौतुक तेवढ्या प्रमाणात केले जात नाही. जेवढे सामान्य शिक्षणाच्या बाबतीत केले जाते. पर्यायाने समाजाचा दृष्टीकोन तसाच दिसून येतो. एखादा विद्यार्थी इंजिनिअरींग किंवा वैद्यकीय शाखेला गेला की त्याच्याकडे पाहण्याचा समाजाचा दृष्टीकोन उंचावतो पण एखादा खेळाडू राज्यपातळीवर खेळला तर समाजात तेवढा मान सन्मान केला जात नाही, ही वस्तुस्थिती नाकारता येत नाही. स्त्रियांच्या शारीरिक शिक्षणाची तर दखलच घेतली जात नाही. कारण स्त्रियांसंबंधीचा समाजाचा दृष्टीकोन अजूनही बदललेला नाही. शारीरिक शिक्षणाची अवस्था अगदी खालावलेली आहे. समिश्र शाळात मुलींच्या खेळासाठी वेळच दिला जात नाही. काही थोड्या मुलींना खेळता येण्यासारख्या खेळात मुलाबरोबर खेळवले जाते. माध्यमिक स्तरावर लिंगभेदानुसार शारीरिक शिक्षणाची व्यवस्था केली जात नाही.

सर्वसाधारण लोकांचा शारीरिक शिक्षण म्हणजे शरीर घटमुट ठेवणे असा समज आहे. या कारणामुळे या महत्वपूर्ण विषयाला न समजणारे सुध्दा स्वतः:ला या विषयाचे तज्ञ समजतात. याच्यात कोणाचाही दोष नाही असे म्हणून चालणार नाही. स्वभावतः:च मनुष्यात अहंभाव असतो व त्याला जर का संधी मिळाली की तो आपला अहंभाव ... व्यक्त करीत असतो. या कारणामुळे कधी-कधी असे लोक की ज्यांनी युवावस्थेमध्ये कोणताही एखादा खेळ खेळला असेल तर ते स्वतः:ला शारीरिक शिक्षण तज्ञ समजत असतात.

स्वतः:ला शारीरिक शिक्षण तज्ञ समजण्यात काही हानी नाही पण ज्यावेळी असे लोक शारीरिक शिक्षण विशेषज्ञ बनून शारीरिक शिक्षणाच्या क्षेत्रात काम करण्यास उतरतात त्यावेळी मात्र बरीच हानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. ज्यावेळी हे तथाकथित तज्ञ जेंव्हा ख-याखु-या तज्ञांना मागे सारुन [स्वतः पुढे सरसावून] जेव्हा काम करु लागतात त्यावेळी मात्र ही बाब फारच हानीकारक ठरते. अशा प्रकारे हे लोक सहाय्यक न बनता अज्ञानाचा प्रचार व प्रसार करणारे ठरतात. त्यामुळे या क्षेत्रातील ज्ञानाचा -हास होतो. हीच अवस्था सध्या शारीरिक शिक्षण क्षेत्राची आहे असे संशोधकास वाटते.

सध्या शारीरिक शिक्षणाच्या संबंधात समाजात अनेक मिथ्या धारणा प्रचारात आहेत. त्या अशा :-

काही लोक शारीरिक शिक्षणाला पी.टी. म्हणून संबोधतात. पी.टी. इंग्रजीतील फिजिकल ट्रेनिंग [Physical Training] शब्दाचे पहिले दोन वर्ण आहेत. या शब्दाचा अर्थ " शारीरिक, प्रशिक्षण" असा घेतला जातो. हे शब्द सैन्यात त्या कार्यक्रमासाठी प्रयोगात आणतात.

जो प्रात:काली सैनिकाना स्वस्थ ठेवण्यासाठी केला जातो. यामध्ये काही व्यक्तीगत व्यायामाचा एक क्रम बनवून त्याचा अभ्यास [सराव] केला जातो.

काही लोक खेळालाच शारीरिक शिक्षण समजतात. अर्थात ते हॉकी, फूटबॉल इत्यादी खेळ खेळणे म्हणजे शारीरिक शिक्षण समजतात.

काही लोक मैदानी खेळालाच शारीरिक शिक्षण समजतात. ज्यामध्ये धावणे, उड्या मारणे, फेकणे इत्यादी बाबी येतात.

शारीरिक शिक्षणाचे एक नांव "ड्रिल" असे घेतले जाते. हा शब्द सुध्दा सैनेमधूनच घेतलेला आहे. व्यक्तीगत व्यायाम सामुहीक स्वरुपात करण्यालाही [Mass Drill] असे म्हणतात.

काही लोक जिमनाष्टीकलाच शारीरिक शिक्षण समजतात त्यामध्ये "कसरतीचे व्यायाम" प्रकार येतात.

"काही लोक शारीरिक शिक्षण म्हणजे स्नायूवर्धन [Muscle Culture] व शरीरवर्धन [Physical Culture] असे समजतात. असे म्हणणाऱ्या लोकांचा फक्त आपल्याच देशात नव्हे तर सुधारलेल्या इतर देशातही आहे. उलट तिकडील काही तज्ज्ञाकडून हे लोण आपल्याकडे आले आहे असे म्हणता येईल". - ११.

वास्तविक पाहता वरील पैकी कुठलाही शब्द "शारीरिक शिक्षणाला" पर्यायी शब्द आहे. असे म्हणणे धारीष्ठ्याचेच ठरेल. हे सर्व शारीरिक शिक्षणाचे कार्यक्रम आहेत.

११] शारीरिक शिक्षणाचा विकास भाग दुसरा [तात्विक]
प्रा. द. ब. कोठीधाले २८ सप्टें. १९६८ पान नं. २

व्यक्तीची अविभाज्यता आपण मान्य केली की, शारीरिक शिक्षणाचे स्वरूपही आपणास पटकन उमजू शकेल. " ज्या पध्दतीत शरीरविकासाबरोबर मन व बुध्दी, नीती, यांच्या विकासास वाव नाही. ज्या पध्दती मुळे शरीर धष्टपुष्ट होते पण मन कमकुवत राहते, स्वार्थी वृत्ती शिल्लक राहते क्रीडापटुत्वाबरोबर क्रीडादाक्षिण्याची वृत्ती निर्माण होत नाही, संघशिस्त, सहकार्य, एकमेकाविषयी [प्रतिस्पर्धी सुध्दा] आदरभाव निर्माण होत नाही ती पध्दती ते खेळ, ते व्यायाम, ते शिक्षण एकांगी स्वरुपाचे व दोषार्ह होय". - १२.

केंद्रिय सरकारच्या शारीरिक शिक्षण सल्लागार समितीने शारीरिक शिक्षणाच्या राष्ट्रीय योजनेमध्ये शारीरिक शिक्षणाची व्याख्या देतांना लिहीले आहे कि " Physical Education is the education of Physical" -- 13.

" शारीरिक शिक्षण हे शरीराचे शिक्षण आहे. " असे त्याचे भाषांतर होऊ शकेल.

अर्थात शरीराला अशा प्रकारे प्रशिक्षीत करणे आवश्यक आहे की, ज्या मुळे व्यक्तिमत्वाचा विकास झाला पाहिजे. परंतु वरील व्याख्या अत्यंत अस्पष्ट व अपूर्ण आहे. केंद्रिय सरकारच्या सल्लागार समितीने उक्त व्याख्या करुन केवळ सरकारलाच चुकिचा सल्ला दिला असे नाही तर समाजात प्रचलित असलेल्या धारणेलाही पुष्टी दिली आहे.

१२] शारीरिक शिक्षणाचा विकास प्रा. द. ब. कोठीवाले, ठोकळ प्रकाशन १९८८ पान नं. २५.

१३] शारीरिक शिक्षा [सिध्दांत एवं तत्वज्ञान] वि. म. मोहन. १९६९ पान नं. ५.

वरील व्याख्येवरून असे स्पष्ट होते की, शरीराला छटपूट करणे म्हणजेच शारीरिक शिक्षण होय. वास्तविक पाहता शारीरिक शिक्षणाच्या कार्यक्रमाच्या आधारावर या शिक्षणाला शारीरिक शिक्षण म्हणतात. परंतु शरीर, मन किंवा आत्म्याला वेगवेगळे केले जाऊ शकत नाही. यामुळे व्यक्तीच्या शारीरिक विकासाला शारीरिक शिक्षण न म्हणता शरीराद्वारे शिक्षण [Education through Physical] म्हणणे अधिक योग्य होईल.

आपला भारत खंडप्राय देश आहे. पण त्यामानाने क्रीडाक्षेत्रात नाव घेण्यासारख्या व्यक्ती आपल्या देशात फारच थोड्या आहेत. या उलट दक्षिण कोरिया हा देश तर खूपच लहान आहे. आपला महाराष्ट्रच त्यापेक्षा तिप्पट मोठा आहे. असे असून देखील तेथील खेळाडूंनी अगदी अलीकडील "सेउल" मध्ये झालेल्या ऑलिम्पिक सामन्यात विविध क्रीडा स्पर्धेत किती तरी पदके पटकावून स्वतःच्या देशाला क्रीडा क्षेत्रात मानाचे स्थान मिळवून दिले आहे. यावरून त्या देशाने शारीरिक शिक्षणाला किती महत्वाचे स्थान दिले आहे हे स्पष्ट होते. जीवनाच्या या अत्यंत महत्वाच्या अंगाकडे आतापर्यंत आपल्या देशात विशेषत: महाराष्ट्र राज्यात खूपच दुर्लक्ष झाले आहे. या संबंधात शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-१, यांच्याकडून दि. ३१.८.८८ ला परिपत्रक निघाले आहे क्र.म. शिस/१४८८/१२१७६/क- त्यातील मजकूर फार बोलका आहे. ते परिपत्रक अतिशय महत्वाचे वाटल्याने विस्ताराने देण्यात येत आहे :-

"शारीरिक शिक्षण हा विषय माध्यमिक स्तरावर इयत्ता १० वी पर्यंत अनिवार्य स्वरूपात शिकवीला जातो. महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत चालू वर्षापासून या

विषयाच्या मुल्यमापनामध्ये श्रेणी देण्याची योजना कार्यान्वित केली जात आहे. नविन शैक्षणिक धोरणामध्येही शारीरिक शिक्षणास योग्य ते महत्व देण्यात आले आहे. तथापि या विषयाच्या अध्यापनाकडे माध्यमिक शाळेकडून द्यावे तितके लक्ष दिले जात नसल्याचे निदर्शनास येत आहे. वास्तविक पाहता शारिरीक शिक्षणासाठी आवश्यक असणारे साहित्य खरेदी करण्याकरीता सत्रशुल्काच्या रकमेतून खर्च करता येतो. त्याच प्रमाणे वेतनेतर अनुदानासाठीही ही बाब ग्राह्य धरली आहे. अशा परिस्थितीत या विषयाच्या अध्यापनामध्ये वास्तविक पाहता माध्यमिक शाळांना अडचणी येऊ नयेत अशी अपेक्षा आहे. शारीरिक शिक्षणासाठी कार्यभार लक्षात घेता स्वतंत्र शिक्षकाची नेमणूक करण्यांत येते. अलिकडे काढण्यांत आलेल्या आदेशानुसार आता २५० विद्यार्थ्यांमागे एक, बी.पी.एड शारीरिक शिक्षक नेमण्याची तरतूद करण्यांत आलेली आहे. असे असू अद्यापही विद्यार्थ्यांना आवश्यक ते साहित्य उपलब्ध करुन दिले जात नाही. असा संशोधकाचा अनुभव आहे.

वर उल्लेखिलेल्या शासकिय परिपत्रकानुसार " आपण आपल्या कार्यक्षेत्रामधील सर्व माध्यमिक शाळांना या संदर्भात एक परिपत्रक काढून विषयाच्या अध्यापनास आवश्यक ते स्थान दिले जाईल असे पहावे, असे म्हटले आहे. शाळांनी शारीरिक शिक्षण शिक्षकास या विषयाच्या अध्यापनासाठी क्रीडांगणावरील व्यवस्थे करीता आपल्या चतुर्थश्रेणी कर्मचा-यापैकी एका कर्मचा-याची सेवा आवश्यकतेनुसार उपलब्ध करुन द्यावी अशा त-हेच्या सुचनाही त्यांना देण्यांत याव्यात."- १४ असेही म्हटले आहे.

---

१४) क्रं. माशिम /१४८८/ १२१७६ / क शिक्षण संचलनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-१, दिनांक ३१.०८.१९८८.

वरील परिपत्रक शिक्षण संचालनालयाचे असल्यामुळे आपणास शारीरिक शिक्षणाकडे सर्व स्तरावर कसे दुर्लक्ष केले जाते याची एक कबुलीच आहे असे म्हणता येईल.

समाजातील बहुसंख्य लोकांचा व शासनाचा असा समज आहे की, सर्वक्षेत्रातून नाकारलेले लोकच शिक्षण क्षेत्राकडे वळतात आणि शारीरिक शिक्षण व्यवसायाकडे त्यातून राहिलेले म्हणजे फारच खालच्या दर्जाचे लोक सहभागी होतात. याला अनेक कारणे असतील पण तज्ज्ञ व्यक्तीअभावी शारीरिक शिक्षणासारख्या महत्वाच्या क्षेत्राचा बोजवारा वाजला आहे. तिच बाब शारीरिक शिक्षकाच्या प्रशिक्षणाची व अभ्यासक्रमाचीही आहे.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने सप्टेंबर १९८१ मध्ये प्रकाशित केलेल्या [१९८२-८३, ८३-८४, व १९८४-८५ मध्ये क्रमाक्रमाने कार्यान्वित झालेल्या] Syllabus for Std. 8th,9th,& 10th या अभ्यासक्रम पुस्तिकेत शारीरिक शिक्षण याच्या अभ्यासक्रमासह शारीरिक शिक्षणाची उद्दिष्टे दिली आहेत ती उद्दिष्टे पुढील प्रमाणे आहेत :-

[१] स्नायुसंस्था, श्वसन संस्था, आणि पचन संस्था याना योग्य प्रकारे कार्यरत ठेऊन शरीर सुदृढ बनविणे.

[२] स्नायुसंस्था आणि मज्जासंस्था यामध्ये परस्पर पूरक सहकार्य घडवून आणण्यासाठी व नुकुल क्रीडाकौशल्यावर ताबा प्रस्तापित करण्यासाठी उपयुक्त सवयी लावून घेणे.

- -

[३] शरीराचे नैसर्गिक सामर्थ्य वाढविण्याकरीता, सर्वांग परिपूर्ण व जोमदार बनविणाऱ्या आणि मनोरंजक ठरणाऱ्या शारीरीक उपक्रमाबाबत आवड निर्माण करणे.

[४] संघवृत्ती, परस्पर सहकार्य, आज्ञाधारकता, नेतृत्व क्रीडाप्रतिष्ठा इत्यादी सद्गुणांचा परिपोष करणे.

[५] विचार प्रवृत्तीच्या प्रकटीकरणास वाव देण्याकरीता स्पर्धातून शिस्तबद्ध द्वेषरहित व स्नेहपूर्ण वातावरण निर्माण करणे.

[६] स्वयंशिस्त व खिलाडूवृत्ती निर्माण करुन तिचा विकास करणे.

[७] समाजसेवेस व आदर्श नागरी वर्तनास पूरक व प्रेरक ठरतील असे कार्यक्रम आयोजित करणे" - १५.

वरील उद्दिष्टाच्या अनुषंगाने विचार केल्यास शिक्षणाचा शारीरिक शिक्षण हा एक अविभाज्य घटक म्हणून संपूर्ण शिक्षण प्रक्रियेत शारीरिक शिक्षणाला योग्य स्थान कसे प्राप्त होईल याचा विचार करणे क्रमप्राप्त ठरते. स्वातंत्र्यानंतर केंद्रिय सरकारने व राज्य सरकारने अनेक प्रयत्न केले आहेत. ते प्रशंसनीय आहेत, परंतु त्यातून अपेक्षित लाभ झाला नाही. हे कोणताही भारतीय नागरीक किंवा शिक्षण क्षेत्राचा जाणकार मानाल.

भारत सरकारने १९८६ मध्ये नविन राष्ट्रीय धोरण जाहीर केले आहे. त्यामध्ये शारीरिक शिक्षणा बाबत ज्या शिफारशी केल्या आहेत त्यापैकी खालील शिफारस महत्वाची आहे.

१५] महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ सप्टेंबर १९८१ पान नं. १८० ते १८७.

"क्रीडा आणि शारीरिक शिक्षण हे अध्ययन प्रक्रियेतील अविभाज्य घटक आहेत. विद्यार्थ्यांने केलेल्या प्रगतीचे मुल्यमापन केले जाईल. शैक्षणिक आकृतिबंधात राष्ट्रीय स्तरावर शारीरिक शिक्षण आणि खेळासाठी अभ्यासक्रमाची रचना करण्यांत येईल."

" या शिफारशीच्या अनुसंधाने महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने इयत्ता १० वी अखेर सार्वत्रिक स्वरुपाची क्रीडा व शारीरिक शिक्षण विषयाची परिक्षा असावी हे तत्वतः मान्य केले आहे. परंतु तत्पूर्वी इयत्ता ९ वी अखेर अशाच त-हेची परिक्षा घेऊन त्यातुन मिळालेल्या अनुभवाने अशा अश त-हेच्या सार्वत्रिक परिक्षाचे स्वरुप ठरवाचे असा मंडळाचा मानस आहे." - १६.

याच्या यशापशाचे मोजमाप करण्यासाठी उच्च दर्जाचे संशोधन करण्यांची आवश्यकता भासेल हे मात्र निश्चित. म्हणूनच नविन आकृतीबंधातील शारीरिक शिक्षणाच्या स्थानाचे फलित किंवा यशापयश उच्च - स्तरावरुनच करावे लागेल असे विधान केल्यास ते योग्यच होईल.

संशोधक हा स्वतः अंशतः शारीरिक शिक्षक असल्याने शारीरिक शिक्षणाशी त्याचा गेली नऊ वर्षे संबंध आहे. त्याने स्वतः शारीरिक शिक्षकाचे प्रशिक्षण घेतले आहे. शारीरिक शिक्षणातील बरेचसे कच्चे दुवे त्याला अस्वस्थ करीत आलेले आहेत. शारीरिक शिक्षण क्षेत्रातील कच्च्या दुव्यांचे नेमके स्वरुप ठरविण्यांची त्याला स्वतःला अत्यंत गरज

१६] शिक्षण संक्रमण एप्रिल, १९८८ अंक ४ महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे.

वाटली या प्रश्नांची व्याप्ती खूप प्रचंड असल्याची जाणीव त्याला आहे. या सर्व प्रचंड प्रश्नांच्या स्वरूपाची कल्पना घेणे हे एक फार मोठे काम आहे. तथापी या प्रश्नांचा भाग म्हणून " परळी शहरातील माध्यमिक स्तरावरील शारीरिक शिक्षणाचा चिकित्सक अभ्यास" करण्याचे संशोधकाने ठरवून प्रस्तुत काम हाती घेतले. हे काम हाती घेतल्याने त्याचे स्वतःचे अनुभव व समजही खरे की खोटे हेही त्याला समजू शकेल.

][{}][

शारीरिक शिक्षणाच्या केवळ खालील व्याख्यामधुन व्यक्त होणारा अर्थ " शारीरिक शिक्षण" म्हणुन स्विकारला आहे. व या संदर्भातच शारीरिक शिक्षण हा शब्द या संशोधनामध्ये वापरला आहे. त्या व्याख्या अशा :-

<u>व्याख्या</u> :-

1) Physical Education is not Education of the Physical but Education through the Physical.

शारीरिक शिक्षण हे मुख्यत: शिक्षण आहे ते शरीराचे शिक्षण नसुन शरीरातर्फे दिले जाणारे शिक्षण आहे.

2) 'Physical Education is that phase of Education which has to dowith the development and training of the whole individual through physical activities'

A.R. WAYMAN.

अर्थात शारीरिक शिक्षण शिक्षणाची ती अवस्था आहे त्याच्या मध्ये शारीरिक कार्यक्रमाद्वारे व्यक्तीमत्वाचा विकास व प्रशिक्षण होते.

"वस्तुस्थिती":- या संशोधनकामी वस्तुस्थिती हा शब्द सद्यस्थिती या अर्थाने उपयोजीलेला आहे. सद्यस्थिती पुढील बाबींचा अंतर्भाव होतो. शाळेत असलेली एकुण विद्यार्थी संख्या प्रशिक्षीत शारिरिक शिक्षकांची संख्या, उपलब्ध असलेले खेळाचे साहित्य, त्याच-प्रमाणे त्या साहित्याची गुणवत्ता, खेळासाठी असलेले मैदान कायम स्वरुपाची आखलेली मैदाने, शारीरिक शिक्षणासाठी विहित वेळापत्रकात

दिला जाणारा वेळ इत्यादी. त्याचप्रमाणे सरावासाठी शाळेच्या वेळाच्या व्यतिरिक्त दिला जाणारा वेळ, शारीरिक शिक्षकाच्या अडचणी मुलींच्यासाठी शारिरीक शिक्षणाची असलेली सोय या सर्व बाबींचा समावेश वस्तुस्थितीत या संज्ञेत केला आहे.

चिकित्सक अभ्यास :-

"अभ्यास " हा शब्द येथे प्राथमिक स्वरुपाचे संशोधन कार्य या अर्थाने उपयोजिलेला आहे.

"चिकित्सा" या शब्दातून संशोधकास मिळालेल्या माहितीची योग्यायोग्यता, अयोग्यता संभवत असल्यास तीची कारणे काय असू शकतील एका विशिष्ट परिस्थितीत कोणता विशिष्ट घटक कारणीभूत असेल, कारकांचा व कारणांचा खराखोटेपणा तर्कसुसंगत पध्दतीने एखाद्या अवस्थेचा विचार करणे वगैरे. हा अर्थ अभिप्रेत आहे. तसेच एखाद्या [येथे शारीरिक शिक्षणाच्या] वस्तुस्थितीच्या तरतुदीच्या सत्यासत्यतेसंबंधीची खात्री, संशोधन कार्यात सहभागी असलेल्या सर्वव्यक्तींनी [संशोधक शारीरिक शिक्षण देणारे शिक्षक] कोणत्याही प्रकारचा पूर्वग्रह किंवा दूषित दृष्टीकोन, त्याच्या आवडी-निवडी ई. बाजूला ठेऊन सत्य व वस्तुनिष्ठ दृष्टीकोन स्विकारणे म्हणजे चिकित्सक अभ्यास होय.

३.क संशोधनाची उद्दिष्टे :-

संशोधकासमोर प्रामुख्याने खालील प्रश्न असल्याने या संशोधन कार्याची उद्दिष्टे खालील प्रमाणे होत :-

[१] परभणी शहरातील माध्यमिक शाळामधील सध्या असलेल्या शारिरिक शिक्षण साहित्याची संख्यात्मक व गुणात्मक उपलब्धता पाहणे.

[२] प्रशिक्षीत शारीरिक शिक्षकांची माहिती मिळविणे.

[३] प्रशिक्षित शारीरिक शिक्षकांची व सेवांतर्गत प्रशिक्षण घेतलेल्या शिक्षकांची माहिती गोळा करणे.

[४] शाळेत शारीरिक शिक्षणासाठी आठवड्यात प्रत्येक वर्गावर किती तासीका दिल्या जातात त्याचा आढावा घेणे.

[५] शाळेत शारीरिक शिक्षणासाठी वेगळा स्वतंत्र विभाग आहे का ते पाहणे.

[६] संमिश्र शाळेत [मुलामुलींच्या] मुलींच्या शिक्षणाची कोणती व्यवस्था व अवस्था आहे याबद्दल माहिती मिळविणे.

[७] पोहण्याचा तलाव, व्यायामगृह, धावपथ आखाडा, यांच्या अवस्थेची व व्यवस्थेची सत्य परिस्थिती जाणून घेणे.

[८] प्रशासकिय स्तरावर राबविल्या जाणाऱ्या कार्यक्रमाचा अभ्यास करुन त्यातील उणीवा व अडचणीची दखल घेणे.

[९] प्रशासकिय स्तरावर राबविल्या जाणाऱ्या कार्यक्रमाचा अभ्यास करुन त्यातील उणीवाचा शोध घेणे.

[१०] असलेल्या शारीरिक शिक्षणासाठी लागणाऱ्या साहित्याची आकडेवारी गोळा करणे.

[११] शारीरिक शिक्षणाच्या अडचणींची नोंद करणे.

[१२] सामान्य शिक्षणाचे ध्येय साध्य करण्यासाठी शारीरिक शिक्षणाद्वारे कोणत्या कार्यक्रमाचा हातभार लागतो याचा आढावा घेणे.

[१३] तेथील शारीरिक शिक्षणात येणा-या अडचणीचा मागोवा घेणे.

[१४] आढळलेल्या सर्व अडचणीवर उपाय योजना सुचविणे.

३.ङ <u>संशोधनाची व्याप्ती व मर्यादा</u> :-

परळी शहरात प्राथमिक, माध्यमिक, उच्चमाध्यमिक व महाविद्यालयीन शिक्षणाच्या सोयी आहेत. फक्त माध्यमिक विभागात मोडणा-या सर्व शाळांची संशोधन कार्यासाठी निवड केली आहे. प्राथमिक शाळा उच्च माध्यमिक शाळा व महाविद्यालये वगळण्यात आलेली आहेत. एकूण विद्यार्थी संख्या त्याच प्रमाणे एकूण शारिरीक शिक्षकांच्या संख्ये पुरते व कार्यक्रमापुरतेच हे कार्य मर्यादित आहे.

३.ड <u>गृहीतक</u> :-

हे संशोधन शारीरिक शिक्षण देणा-या शिक्षकांनी पुरवावयाच्या माहितीवर प्रामुख्याने अवलंबुन असल्याने "शिक्षक खरोखरी माहिती पुरवितात" असे गृहीत धरले आहे.